महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय इमारत संकुल,
क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय इमारत, मुंबई-४०० ००१
दुरध्वनी क्रमांक : (०२२) २२६१८३७० Email : wssd.compsec@mah.gov.in

---

क्र. संगणक २०२१/प्र.क्र.१२/संगणक दिनांक: २४ जानेवारी, २०२४.

प्रति,

मे.

विषय :- पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकरीता न्यायालयीन प्रकरणांच्या अनुषंगाने वेब आधारित प्रणाली राबविण्याबाबत.

महोदय / महोदया,

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या तसेच आस्थापना विषयक बाबींच्या अनुषंगाने विविध न्यायालयीन प्रकरणे उद्भवत असतात. विभागातील न्यायालयीन प्रकरणे प्रभावीपणे व जलदरीत्या हाताळणे शक्य व्हावे यासाठी खालील नमुद वैशिष्ट्ये अंतर्भुत असणारी ३० अनुज्ञप्ती (License) सह वेब आधारीत प्रणाली विभागात १ वर्षाकरीता कार्यान्वीत करणे आवश्यक आहे.

a. Import cases as the gate filed against you in High court
b. Hearing dates Management by having automatic Synchronisation with Court websites
c. Daily or supplementary customised cause list/ board
d. Case management along with the digital case diary.
e. Document management
f. Automatic reminders (SMS and email), calendars and Notifications
g. To dos/ Task management with automatic reminder via SMS and email.
h. Notes, expenses, timesheet management
i. Department and users management.
j. Secure collaboration.
k. Notification Customization
l. Customization of Reminder
m. All types of High Court Cause list (Supplementary, Testamentary, Officer Cause list, Notices, etc.)
n. Google Calendar integration and Backup facility in software.

o. Auto Population of Department Cases from the High Court with reminder.

p. For any Technical issue on call facility and visit.

०२. तरी वरील नमुद सेवा पुरविण्यासाठी किती रक्कम आकारण्यात येईल, याबाबत आपले दर (करांसहित) सादर करावेत. सदर दरपत्रके सिलबंद लिफाफ्यामध्ये सादर करावीत. लिफाफ्यावर "न्यायालयीन प्रकरणांच्या अनुषंगाने वेब आधारित प्रणाली राबविण्यासाठी दरपत्रके" असे नमूद करण्यात यावेत व लिफाफ्यावर व दरपत्रकावर आपल्या संस्थेची स्वाक्षरी व शिक्का असणे आवश्यक आहे. दरामध्ये खाडाखोड करता कामा नये.

०३. सदर दरपत्रके कक्ष अधिकारी, संगणक कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय इमारत, मुंबई-४०० ००१ या ठिकाणी स्वत: अथवा पोस्टाने दि. ०५.०२.२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजेपर्यंत सादर करण्यात यावीत.

उप सचिव, संगणक कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय इमारत, मुंबई-४०० ००१ या ठिकाणी दि. ०५.०२.२०२४ रोजी दुपारी ३:०० वाजता उघडण्यात येतील. दरपत्रके उघडतेवेळी आपण स्वत: किंवा आपल्या संस्थेचा एक प्रतिनिधी उपस्थित राहू शकतो. प्राप्त दरपत्रके स्विकारणे, कोणतेही कारण न देता नाकारण्याचे व दरपत्रके प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी राखून ठेवलेले आहेत. खालील कागदपत्रे स्वतंत्र लिफाफ्यात (दरपत्रक लिफाफ्याव्यतिरिक्त) सादर करणे आवश्यक आहे.

१) उद्योग आधार नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र
२) GST प्रमाणपत्र
३) दरपत्रककार संस्थाविक्रेत्याचे पॅनकार्ड/
४) न्यायालयीन प्रकरणांच्या अनुषंगाने वेब आधारित प्रणाली राबविल्याबाबत अनुभवाचे प्रमाणपत्र
५) मागील ३ वर्षाचे आयकर भरल्याचे प्रमाणपत्र.

०४. तसेच दरपत्रक प्राप्त झाल्यानंतर विभागाने दर मान्य केल्यास अटी व शर्तीच्या अधिन राहून संस्थेची नियुक्ती करण्यात येईल.

(संजय काळभोर)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

F:\Computer Desk\MML.Docx

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय इमारत संकुल,
क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय इमारत, मुंबई-४०० ००१
दुरध्वनी क्रमांक : (०२२) २२६१८३७० Email : wssd.compsec@mah.gov.in

---

क्र. संगणक २०२१/प्र.क्र.१२/संगणक दिनांक: २४ जानेवारी, २०२४.

प्रति,

अवर सचिव
माहिती व तंत्रज्ञान संचालनालय,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

विषय :- राज्य शासनाच्या संकेतस्थळावर (Website) वर दरपत्रक मागविणे बाबतची माहिती प्रसिद्ध करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकरीता न्यायालयीन प्रकरणांच्या अनुषंगाने वेब आधारित प्रणाली राबविणे आवश्यक आहे.

सदर काम करण्याकरिता स्थानिक पुरवठादारांकडून दरपत्रक मागविणे आवश्यक आहे. याकरिता सोबत जोडलेले दरपत्रके सादर करण्याबाबतचे पत्र राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर (Website) नवीन संदेश या शिर्षकाखाली प्रसिद्ध करण्यात यावे, ही विनंती.

(संजय काळभोर)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे.

प्रत :-

१) मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२) उप सचिव (संगणक शाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) निवडनस्ती, संगणक शाखा